नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०३/२०२५ ( शुक्रवार ) सकाळ

---

# अवैधरित्या विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद कन्हान पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन कन्हान :—दिनांक २७/०३/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, लाल रंगाच्या ब्रेझा गाडीमध्ये अवैधरित्या विनापरवाना दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तरसा रोड वरील देशमुख किरणा दुकानासमोर नाकाबंदी केली असता संशयीत लाल रंगाची ब्रेझा गाडी क्रमांक एम एच ४० ए.के. ६९४२ मिळुन आली सदर वाहन थांबवुन चालकाला नाव पत्ता विचारला असता तरूण अरूण प्रसाद ,वय ३१ वर्षे, रा चनकापुर खापरखेडा अशी माहीती प्राप्त झाली. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये Tuborg Storng आणि Kingfisher Strong अशा कंपनीच्या बियरच्या टिन कॅन आणि बॉटल आढळुन आल्या. पोलीसांनी पंचासमक्ष Tuborg Storng आणि Kingfisher Strong अशा कंपनीच्या बियरच्या टिन कॅन आणि बॉटल एकुण किंमती १६,४४०/— रूपये आणि २) ब्रेझा गाडी क्रमांक एम एच ४० ए.के. ६९४२ किंमती ७,००,०००/— रूपये असा एकुण **७,१६,४४०/—रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी नमुद नमुद आरोपीवर विरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ६५(ई), ६५ (ए) म.दा.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर